# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२५**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## मुंबई विद्यापीठात पुनर्मूल्यांकनासाठी दरवर्षी विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याबाबत

**(१) ३६७ (१६-०४-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या कला, वाणिज्य, विधी, विज्ञान तंत्रज्ञान विद्या शाखेच्या विविध परिक्षांच्या पुनर्मूल्यांकनासाठी शैक्षणिक वर्ष २०२१ ते २०२४ या चार वर्षांच्या कालावधीत जवळपास ८,८,४५५ रुपये एवढे शुल्क विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाला भरले गेल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठातर्फे एका विषयाच्या पुनर्मूल्यांकनासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून २५० रुपये, राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून १२५ रुपये तर एका विषयाच्या उत्तर पत्रिकांच्या छाया प्रतींसाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ५० आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना २५ रुपये शुल्क आकारात असून गरज असल्यास शिक्षकांना प्रवास भत्ता ही द्यावा लागत असल्याने त्याचा आर्थिक बोजाही विद्यार्थ्यांवर पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बहुसंख्य विद्यार्थी हे पुनर्मूल्यांकनानंतरच उत्तीर्ण होत असल्याने विद्यापीठाच्या चुकीमुळे विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांना भुर्दंड पडू नये यासाठी पुनर्मूल्यांकन शुल्क कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१७-०६-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

मुंबई विद्यापीठातर्फे एका विषयाच्या पुनर्मुल्यांकनासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्याकडून २५० रुपये तर राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून १२५ रुपये आणि एका विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या छाया प्रतींसाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ५० आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना २५ रुपये एवढे शुल्क आकारण्यात येते. उत्तरपत्रिकांची तपासणी OSM (On screen Marking) पद्धतीने होत असल्याने यासाठी शिक्षकांना प्रवासभत्ता देण्यात येत नाही. त्यामुळे, विहित शुल्काशिवाय शिक्षकांच्या प्रवासभत्त्याचा आर्थिक बोजा विद्यार्थ्यांवर पडत नाही.

(३) हे खरे नाही.

उत्तरपत्रिकांची तपासणी OSM (On screen Marking) पद्धतीने होते. प्रथम मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन यासाठी वेगवेगळे शिक्षक असल्या कारणास्तव स्वाभाविकरित्या थोड्याफार प्रमाणे गुण वाढ/ घट होते. ज्या विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये वाढ होऊन उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक गुण प्राप्त झाले तरच असे विद्यार्थी उत्तीर्ण होतात.

(४) मुंबई विद्यापीठामध्ये शैक्षणिक वर्ष २०१६ पर्यंत पुनर्मुल्यांकनाचे शुल्क सर्वसाधारण प्रवर्गासाठी रुपये ५०० तर राखीव प्रवर्गासाठी रुपये २५० होते. पुढे विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार विद्यापीठाने सदर शुल्क निम्म्यापर्यंत म्हणजेच

सर्वसाधारण प्रवर्गासाठी रुपये २५० तर राखीव प्रवर्गासाठी रुपये १२५ केले आहेत. तसेच, विद्यापीठाकडून शिक्षकांना उत्तर पत्रिका काळजीपूर्वक तसेच जबाबदारीने तपासण्याबाबतच्या सूचना देण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) येथील नितीन देसाई स्टुडिओच्या वृध्दीसाठी सल्लागार नेमून कृती आराखडा तयार करण्याबाबत**

**(२) ४९९ (०८-०४-२०२५). श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) येथे नितीन देसाई यांनी उभारलेल्या स्टुडिओचे अद्ययावतीकरण करण्याबाबत विकास आराखडा तयार करण्यात आला असून त्या विकास आराखडयाला राष्ट्रीय कंपनी विधी प्राधिकरणाने व शासनाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०२४ रोजी मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार स्टुडिओचे आधुनिकीकरण व व्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने अद्याप तज्ञ सल्लागारांची नियुक्ती केली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तज्ञ सल्लागारांची नियुक्ती व स्टुडिओचे काम सुरु करुन रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०७-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.

राष्ट्रीय कंपनी विधी प्रधीकरणाने दिनांक १४ नोहेंबर २०२४ पासून शासनाचा उपक्रम असलेले महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या. यांना एन.डि. आर्ट वर्ल्ड हि कंपनी ताब्यात घेण्याची प्रक्रीया करणे व त्याचे दैनंदीन परिचलन करणे तसेच त्याच्या विकासाकरीता योजना तयार करणे या सर्वांकरीता महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाने मान्यता दिली त्यानुसार विकास आराखडा तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या. अंतर्गत नियुक्त सल्लागाराकडून तसेच आराखडा व परीचलनाच्या दृष्टीने विविध विषया नुसार सल्लागारांच्या सल्ल्याने कामकाज (विषयनिहाय) करण्यात येते आहे.
(३) तज्ञ सल्लागारांची नियुक्ती व स्टुडिओचे काम सुरु करुन रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देण्याकरिता कार्यवाही सुरु आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील आरे व महानंदाचे स्टॉल इतरांना चालविण्यासाठी दिल्याबाबत**

**(३) ७९३ (२६-०४-२०२५). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे डेअरीच्या वरळी, कुर्ला, गोरेगाव येथील डेअरी मागील अनेक वर्षापासून बंद झाल्याने आरे व महानंदाचे मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सांगली, मिरज, लातूर व इतर शहरात वितरित करण्यात आलेले स्टॉल मात्र तसेच चालू असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्टॉल धारकांनी हे स्टॉल इतरांना चालविण्यासाठी दिल्याने शासनाचे स्थानिक नागरिकांना रोजगार देण्याचे धोरण अयशस्वी ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्टॉल ज्यांना दिले त्यांच्या वारसदारांना किंवा स्थानिकांना देऊन या स्टॉलमध्ये किमान दोघांना रोजगार उपलब्ध होण्याकरीता कोणती उपाययोजना केली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१८-०६-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ११.११.२००२ रोजीचे शासन निर्णयान्वये शासनाचा दुग्धव्यवसायातील सहभाग टप्याटप्याने कमी करुन सहकारी दुध संघ व सहकारी दुध संस्था यांना चालना देण्यासाठी धोरण अवलंबिले आहे. त्यास अनुसरुन आरे स्टॉलमध्ये पूर्वी शासनाचे दुध व दुग्धजन्य पदार्थ विकण्याचे बंधनकारक होते. परंतु शासनाचे दुध कमी होत गेल्याने स्टॉल धारकांच्या उदरनिर्वाहच्या दृष्टिने आरे केंद्रावर इतर सहकारी व व्यवसायिक संस्थांचे दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री करण्याची परवानगी दिलेली आहे.

(२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

शासन धोरणानुसार स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टिने आरे स्टॉल चालविण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार मागील ४० ते ५० वर्षापासुन स्टॉल धारक दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री करुन उपजिविका भागवित आहेत. दुग्धव्यवसाय विकास विभागा मार्फत स्टॉल तपासणी पथके तयार करण्यात येतात व आरे स्टॉलधारकांची पथकांमार्फत तपासणी करण्यात येत असते व तपासणीमध्ये स्टॉलधारक दोषी अढळल्यास दोषी स्टॉल धारकाचे स्टॉल शासन नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

---

## मुंबई विद्यापीठाच्या दुरस्थ व ऑनलाईन शिक्षण विभागाच्या मराठी परीक्षेतील प्रश्नपत्रिका वितरणातील विसंगतीबाबत

**(४) ८०७ (०५-०५-२०२५). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण विभागाच्या मराठीच्या परीक्षेत एकत्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वेगवेगळे पेपर दिल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठी विभागाच्या एमए मराठी नियमित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला पेपर सीडीओईच्या विद्यार्थ्यांना देण्यात आला तर सीडीओईच्या अन्य केंद्रांवर परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना दुसरा म्हणजेच सीडीओईने तयार केलेला पेपर दिला गेला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१७-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) विद्यापीठाच्या दुरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रावरील १० विद्यार्थ्यांना दुरस्थ व ऑनलाईन विद्यार्थ्यांसाठीच्या एम.ए. मराठी प्रश्नपत्रिके ऐवजी विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांसाठीची प्रश्नपत्रिका वितरीत करण्यात आली.
(३) याबाबत मुंबई विद्यापीठाने संचालक, दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र (CDOE) यांच्याकडून खुलासा घेऊन ही बाब परीक्षा व मुल्यमापन मंडळापुढे दिनांक ०७ फेबुवारी, २०२५ रोजी ठेवली त्यावर परीक्षा व मुल्यमापन मंडळाने ज्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रावर असे घडले असेल त्या केंद्रावरील प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून त्यांना अधिकचे सरसकट १५% गुण देण्याचा निर्णय घेतला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) येथील बसस्थानकांचे नूतनीकरण करण्याबाबत**

**(५) १०३९ (०८-०४-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील बस स्थानकाची दूरवस्था होऊन ते कोसळण्याच्या स्थितीत असताना ते दुरुस्त न करता केवळ परिसरातील रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यात येत असल्याने प्रवाशांच्या जिवास धोका निर्माण झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी करुन बसस्थानकांचे नूतनीकरण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (२६-०६-२०२५) :** (१), (२) व (३) वसई येथील बसस्थानकाची दुरावस्था झाल्यामुळे इमारतीच्या विशेष दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

---

**खानापूर तालुक्यातील उमरकांचन (कार्वे), मेंढ (कळंबी) व उमरकांचन (माहुली) (जि.सांगली) या गावांच्या पुनर्वसनाचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत**

**(६) १०९५ (२८-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील उमरकांचन (कार्वे), मेंढ (कळंबी) व उमरकांचन (माहुली) या गावांच्या पुनर्वसनाचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असुन गावठाणा अंतर्गत नागरी सुविधा नसल्याने नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार नागरी सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

खानापूर तालुक्यातील उमरकांचन (कार्वे), मेंढ (कळंबी) व उमरकांचन (माहुली) (जि. सांगली) या गावातील सर्व नागरी सुविधांची कामे पुर्ण झाली असून सदर पुनर्वसित गावठाणे जिल्हा परिषद सांगली यांच्याकडे जिल्हाधिकारी, सांगली यांचा आदेश जा.क्र.पुनर्वसन / आरआर-१ / ६१७ / २०१८ दिनांक १७.१२.२०१८ च्या अन्वये हस्तांतरीत करण्यात आली आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पशुधन व्यवस्थापन व दुग्ध उत्पादक पदविकाधारकांच्या न्याय मागण्याबाबत**

**(७) ११०१ (०८-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील "पशुधन व्यवस्थापन व दुग्धउत्पादन" (मैत्री) पदविका धारकांना त्यांचे थकीत वेतन अदा होणे, राष्ट्रीय गोकुळ मिशन (मैत्री) अंतर्गत नियुक्त एलएमडीपी पदविकाधारकांना मासिक तत्त्वावर मानधनाची तरतूद मिळणे, तसेच पशुधन पर्यवेक्षक यांच्या शासकीय नियुक्तीच्या प्रक्रियेमध्ये राष्ट्रीय गोकुळ मिशन (मैत्री) अंतर्गत प्रशिक्षण प्राप्त

विद्यार्थ्यांना प्राधान्य मिळणे इत्यादी मागण्याबाबत मा.मुख्यमंत्री, दुग्ध विकास व पशुंवर्धन, मंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, "पशुधन व्यवस्थापन व दुग्धत्पादन" पदविकाधारक २०२३-२०२४ मध्ये मैत्री या योजनेअंतर्गत "पशुवैद्यकीय महाविद्यालय परभणी" येथून २०२२-२०२३ या वर्षामध्ये प्रशिक्षण पूर्ण केलेल्या आणि मैत्री अंतर्गत सेवा पुरवलेल्या सेवादात्यांना अद्याप देखील शासन नियमानुसार वेतन प्राप्त झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दर चार पाच वर्षानंतर महाराष्ट्र शासनातर्फे पशुधन पर्यवेक्षकांच्या शासकीय भरतीची प्रक्रिया करण्यात येते, मात्र या शासकीय प्रक्रियेमध्ये मैत्री अंतर्गत प्रशिक्षण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रामुख्याने विचार केला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने पशुधन व्यवस्थापन व दुग्ध उत्पादन पदविका धारकांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
केंद्र शासनाच्या राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत मैत्री योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना ठोक मानधन/वेतन अदा केले जात नाही. सदर प्रशिक्षणार्थींनी ९० दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर स्वतंत्ररीत्या कृत्रिम रेतनाचे कार्य करणे अपेक्षीत असून, केलेल्या कृत्रिम रेतनाच्या नोंदी अधिकृत संकेतस्थळावर करणे आवश्यक आहे. यानूसार केलेल्या नोंदीची पडताळणी केल्यानंतर प्रति कृत्रिम रेतन रु. ५०/- तसेच प्रति जन्मलेल्या वासराकरीता रु. १००/- प्रोत्साहनपर अदा केले जाते.
(३) व (४) हे खरे आहे.
पशुसंवर्धन विभागांतर्गत पशुधन पर्यवेक्षक पदाची भरती सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार करण्यात येते. सदरहू सेवाप्रवेश नियमामध्ये मैत्री अंतर्गत ९० दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण असावे अशी शैक्षणीक अर्हता समाविष्ठ नाही.
(५) विलंब नाही.

---

## सोलापूर वस्त्रोद्योगाला लागणाऱ्या मनुष्यबळ यंत्राच्या दुरुस्तीबाबत

**(८) ११२७ (३०-०४-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर मॅन्युफॅक्चर गारमेंट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधीच्या नेतृत्वात मा.राज्यपाल महोदयांकडे झालेल्या बैठकीत गारमेंट उद्योगाला लागणाऱ्या मनुष्यबळ यंत्राच्या दुरुस्तीसाठी लागणारे कामगार तयार करण्यासाठी सोलापूर विद्यापीठात अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत प्रशासनाला निर्देश दिले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर युनिफॉर्म हब व्हावे यासाठी सोलापूर विद्यापीठात व गारमेंट असोसिएशन यांच्यात कोणता सामंजस्य करार करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१७-०६-२०२५) :** (१) व (२) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या विद्यापीठाचा २० वा दीक्षांत समारंभ दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी मा. राज्यपाल महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. दीक्षांत समारंभ संपन्न झाल्यानंतर मा. राज्यपाल महोदयांची जिल्हाधिकारी, सोलापूर मॅन्युफॅक्चर गारमेंट असोसिएशनचे पदाधिकारी व विद्यापीठाचे सांविधिक अधिकारी

यांच्यासह अनौपचारिक बैठक झाली होती. या बैठकीमध्ये गारमेंट उद्योगाला लागणारे मनुष्यबळ / कामगार तयार करण्यासाठी विद्यापीठात अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत चर्चा झाली. त्यावेळी, असा प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे अभ्यासक्रम तयार करण्याची सहमती विद्यापीठाने दर्शविली होती. तथापि, सोलापूर मॅन्युफॅक्चर गारमेंट असोसिएशनच्या वतीने कोणताही प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झालेला नाही. तसेच, सोलापूर युनिफॉर्म हब व्हावे यासाठी सोलापूर विद्यापीठ व गारमेंट असोसिएशन यांच्यात कोणताही सामंजस्य करार करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईतील तेरणा रुग्णालयात उपचाराचे देयक भरणा करण्याबाबत दिलेली धमकी**

**(९) १४३६ (२६-०४-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील तेरणा रुग्णालयात श्री.नरेंद्र गाढे यांच्या लहान मुलाचे उपचार सुरु केल्यानंतर, उपचार्थ थकीत देयक त्वरीत भरण्याबाबत वारंवार रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांनी दूरध्वनीद्वारे संपर्क केला असून, सदरहू देयकाचा भरणा न केल्यास मुलाचे उपचार थांबविण्यात येतील अशी धमकी वैद्यकीय अधिकारी यांनी दिनांक २७ जुलै, २०२४ रोजी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेल्या धमकीमुळे श्री.गाढे यांनी त्याच दिवशी म्हणजे दिनांक २७ जुलै, २०२४ रोजी आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधिताविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०२५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

तेरणा हॉस्पीटल येथील बिलिंग स्टाफ (प्रशासन) यांनी थकीत बिल भरण्याबाबत नरेंद्र गाडे यांना वारंवार फोन करुन मानसिक त्रास दिल्याने आत्महत्या केली असल्याची तक्रार मयत व्यक्तीच्या भावाने नेरुळ पोलीस ठाणे येथे केली होती.

मयत नरेंद्र गाडे यांनी मृत्यूपूर्वी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीमध्ये बिलिंग स्टाफकडून थकीत देयकाबाबत पाठपुरावा करण्यात येत असल्याची बाब नमूद केली आहे.

गुन्ह्याच्या तपासाअंती तेरणा हॉस्पीटल मधील बिलिंग स्टाफ व प्रशासन यांनी मयत नरेंद्र गाडे यास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबाबत वा मुलाचे उपचार थांबविण्याबाबत वैद्यकीय अधिकारी यांनी धमकी दिली असल्याचा कोणताही सबळ पुरावा आढळून आलेला नाही.

(३) नरेंद्र गाडे यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने तेरणा हॉस्पीटल प्रशासनाविरोधात तक्रारदार यांनी तक्रार दाखल केल्यामुळे नेरुळ पोलीस ठाणे येथे दि.२७.०७.२०२४ रोजी गु.र.क्र.४४८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०८, ३ (४) सह अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ व २०१५ चे सुधारित कलम ३ (२) (v) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तेरणा हॉस्पीटल मधील बिलिंग स्टाफ व प्रशासन यांनी मयत नरेंद्र गाडे यास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबाबत कोणताही सबळ पुरावा गुन्ह्याच्या तपासात आढळून आलेला नसल्यामुळे पुराव्याअभावी "अ" समरी अहवाल दिनांक २८.०२.२०२५ रोजी मा. विशेष जिल्हा व सत्र न्यायालय, बेलापूर न्यायालय येथे सादर करण्यात आलेला आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील नागरी सहकारी बँक संदर्भातील समितीच्या अहवालाबाबत

**(१०) १६२९ (०५-०५-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ४३५ नागरी सहकारी बँका असून करोनानंतर या बँकांना व्यवसाय करताना अनेक येत असलेल्या अडचणींचा अभ्यास करुन त्यांना शासनाकडून कोणती मदत करता येईल का याबाबत अहवाल देण्यासाठी राज्य शासनाने माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त समितीने माहे जून, २०२४ मध्ये आपला अहवाल शासनाकडे सुपूर्द केला असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील अहवालावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (१८-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.

शासनाने दिनांक ०४.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री विद्याधर अनास्कर, प्रशासक महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे.

(२) हे खरे आहे.

सदर समितीने तिचा अहवाल दिनांक २५.०१.२०२४ रोजी शासनास सादर केला आहे.

(३) समितीच्या अहवालातील शिफारशींवर सहकार आयुक्त व शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून सदर समितीच्या अहवालातील अनेक तांत्रिक शिफारशींवर तज्ञांचे मार्गदर्शन व भारतीय रिझर्व्ह बँकेशी चर्चा करण्यात येत आहे.

केंद्र शासनाने भारतीय रिझर्व्ह बँकेशी सल्लामसलत करून Umbrella Organization (National Urban Cooperative Finance And Development Corporation Limited) या संस्थेची स्थापना केली आहे. सदर संस्थेमार्फत राज्यात खालीलप्रमाणे कामकाज प्रस्तावित आहे- अ) राज्यातील नागरी सहकारी बँकांना भागभांडवल वृद्धीसाठी मदत करणे. ब) आणीबाणीच्या परिस्थितीत आणि भांडवल तरलतेच्या संकटामध्ये नागरी सहकारी बँकांना तरलता देण्यासाठी मदत करणे. क) सभासद नागरी सहकारी बँकांना गतिमान आणि विश्वासार्ह आयटी पायाभूत सुविधा पुरविणे. ड) स्पर्धेला प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी सभासद नागरी सहकारी बँकांना प्रशिक्षण, सल्ला इ.साठी मदत करणे.

या संस्थेच्या माध्यमातून राज्यातील नागरी सहकारी बँकांचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटणार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या मंत्रालयातील बँक खात्यातून अज्ञात चोरट्यांनी रक्कम काढल्याबाबत

**(११) १६५९ (२६-०४-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या मंत्रालयातील बँक खात्यातून ४७ लाख ६० हजार रुपये अज्ञात चोरटयांनी खात्यातून काढली असल्याची घटना माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने आतापर्यंत किती जणांना अटक करण्यात आली असून, त्यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदरबाबत मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ९३/२०२४ कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७३, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) २ आरोपींना सी.आर.पी. कलम ४१ (अ) (१) अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच तपासात निष्पन्न इतर आरोपींचा शोध चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कारेची (जि.गडचिरोली) नगर पंचायत क्षेत्रातील महिला मजूरांना मिरची तोडण्याच्या नावाखाली ऊस तोडणीसाठी नेल्याबाबत

**(१२) १६६७ (२६-०४-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारेची (जि.गडचिरोली) नगर पंचायत क्षेत्रात २०१५ पासून रोजगार हमी योजनेची कामे बंद असल्याने या भागातील महिला मजूरांना मिरची तोडण्याच्या नावाखाली ऊस तोडणीसाठी फूस लावून पळवून नेणारी दलालांची टोळी सक्रीय असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने किती जणांना अटक केली व त्यानुषंगाने संबंधितविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०२५) :** (१) हो, हे खरे आहे.

कोरची (जि.गडचिरोली) नगर पंचायत क्षेत्रातील महिला मजूरांना मिरची तोडण्याच्या नावाखाली ऊस तोडण्यासाठी घेऊन गेल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी दिनांक ०७.०१.२०२५ रोजी प्राप्त फिर्यादीवरुन कोरची पोलीस ठाणे, जि.गडचिरोली येथे भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), १२६ (२), ३५१ (२), ३५२, १२५ (२), ३ (५) गु.र.नं.००३/२०२५ अन्वये ४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्यातील नमूद चारही आरोपी हे बीड जिल्ह्यातील रहिवासी आहेत. गुन्ह्यातील मुख्य आरोपी पोलीसांची चाहुल लागताच पळुन गेला असल्याने त्याची माहिती काढण्याबाबत पोलीस स्टेशन माजलगाव ग्रामीण, जि. बीड यांना सुचित करण्यात आले आहे. यातील इतर ०३ आरोपींचा गुन्ह्यात सहभागाबद्दल पोलीस तपास सुरु असल्याने त्यांना दिनांक १३/०३/२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता कलम ३५ (३) प्रमाणे नोटीस देऊन तपासात सहकार्य करण्याच्या अटीवर सोडण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डोणगांव (जि.बुलढाणा) परिसरातील किशोरवयीन मुले खोकल्याच्या औषधाचा वापर नशेसाठी करीत असल्याबाबत

**(१३) १६७४ (२६-०४-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोणगांव (जि.बुलढाणा) परिसरातील काही किशोरवयीन मुले सोल्यूशनचा तसेच काही युवक खोकल्याच्या औषधाचा (Codeine Phosphate) वापर नशेसाठी करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०६-२०२५) :** (१), (२) व (३) डोणगांव (जि. बुलढाणा) परिसरातील काही किशोरवयीन मुले सोल्यूशनचा तसेच काही युवक खोकल्याचे औषधाचा (Codeine Phosphate) वापर नशेसाठी करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान अन्न व औषध प्रशासनास निदर्शनास आली नाही. तसेच पोलीस विभागाकडे त्याबाबत एकही तक्रार/गुन्हा दाखल नसल्याने चौकशी करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्रादेशिक देशी गोपालक शेतकरी बांधव यांना ५० रुपये प्रतिदिन असे प्रती गाय अनुदान मिळणेबाबत**

**(१४) १७२३ (०८-०४-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रादेशिक देशी गोपालक शेतकरी बांधव यांना रुपये ५० प्रतिदिन प्रती गाय अनुदान मिळावे याकरिता लोकप्रतिनिधींनी मा.पशुसंवर्धन मंत्री यांना दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय क्र.पविआ-११२४/प्र.क्र.१८४/पदुम-३, दिनांक ०८.१०.२०२४ अन्वये शेती व दुध यासाठी अनुत्पादक गोवशांचे संगोपन करणे व्यावसायिकदृष्टया किफायतशीर ठरत नसल्याने बहूतांश जनावरे गोशाळेत ठेवण्यात येतात. त्यामुळे गोशाळांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच आर्थिकदृष्टया सक्षम करण्याची आवश्यकता विचारात घेऊन मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने कृषि व पदुम विभाग, सन २०२४-२५ पासून महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळेत ठेवण्यात येणा-या गायींना रु.५०/- प्रति दिन प्रति गोवंश अनुदान देण्यासाठी योजना राबविण्याचा निर्णय जाणीवपूर्वक घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जत (जि.सांगली) तालुक्यात नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करण्याबाबत**

**(१५) १९५९ (०८-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील वाहनधारकांना प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संबंधित कामे करण्यासाठी १५० ते १८० कि.मी. लांबचा प्रवास करुन सांगली येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात जावे लागत असल्यामुळे वाहनधारकांचा वेळ वाया जात असून आर्थिक भार सोसावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहनधारकांची गैरसोय टाळण्यासाठी जत आणि कवठेमहाकाळ तालुक्यांसाठी जत शहरात नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जत शहरात नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०२-०७-२०२५) :** (१), (२), (३) व (४) गृह विभाग, शासन निर्णय क्र.एमव्हीडी ०१२५/प्र.क्र.०६/परि-४, दि. ०९.०६.२०२५ अन्वये, जत, जि.सांगली येथे नवीन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

---

## भिवंडी (जि.ठाणे) शहरामध्ये नविन उप-प्रादेशिक परिवहन विभागाचे (RTO) कार्यालय स्थापन करण्याकरिता शासनाने जागा उपलब्ध करुन मंजुरी देण्याबाबत

**(१६) २२०८ (२६-०४-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने प्रादेशिक परिवहन विभागाचे (RTO) एक उपप्रादेशिक परिवहन कार्यालय उभारण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी RTO चे उपप्रादेशिक कार्यालय नसल्याने वाहतुकीच्या संदर्भात कोणत्याही समस्या असल्यास नागरीकांना ठाणे येथे जावे लागत असल्याने स्थानिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी कार्यालय होण्यासाठी मौजे दापोडे (भिवंडी) येथील गुरचरण महाराष्ट्र शासन अशी जागा विभागाच्या अधिकाऱ्यांनी निश्चित केली असूनही त्यावर कोणताही निर्णय अद्यापी न झाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी परिवहन विभागास दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजी निवदेनाद्वारे मागणी केलेली आहे, तसेच शासनाची पर्यायी जागा उपलब्ध करण्यासह तात्काळ मंजुरी देण्याबाबत मा.परिवहन मंत्री यांस दिनांक २४ जानेवारी, २०२५ निवदेनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०२-०७-२०२५) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
तथापि, प्रादेशिक परिवहन कार्यालय,ठाणे कार्यालयामार्फत भिवंडी येथे शिबीर कार्यालय आयोजित करण्यात येते.
(३) होय.
(४) मौजे दापोडे ग्रामपंचायत हद्दीतील गुरचरण, महाराष्ट्र शासन या जागेची पाहणी करुन २.०० हे.आर. जागा मिळावी या करिता दापोडे ग्रामपंचायतीला दिनांक ०२.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली होती. परंतू दापोडे ग्रामपंचायतीने सदर जागा शासनाकडे वाढीव गावठाण व नवीन गावठाण याकरिता मागणी केली असल्याने प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे कार्यालयाचा अर्ज दिनांक २१.१२.२०२२ रोजी नामंजूर केला आहे.
परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दिनांक २८.०४.२०२३ रोजीच्या अहवालानुसार तसेच, दिनांक १८.०६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्मीतीच्या निकषांनुसार भिवंडी, जि.ठाणे येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करता येणार नाही.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## येरमाळा (ता.कळंब, जि.धाराशिव) येथील कृषी विज्ञान केंद्राच्या जागेमध्ये पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत

**(१७) २२४३ (२५-०४-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरमाळा (ता.कळंब, जि.धाराशिव) येथील कृषी विज्ञान केंद्राच्या जागेमध्ये पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी शासनाकडे दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजी लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाराशिव जिल्ह्यातील वाढत्या पशुधनाची संख्या पाहता तेथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू केल्यास प्रभागातील विद्यार्थ्यासोबत शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येरमाळा येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), व (४) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत एकूण ०५ पशुवैद्यकीय घटक पदवी महाविद्यालय मुंबई, नागपूर, परभणी, उदगीर (जि.लातूर) व शिरवळ (जि.सातारा) येथे कार्यरत आहेत. तसेच शासनामार्फत ४ नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये (अकोला व सावळी विहीर (जि.अहिल्यानगर), परळी (जि.बीड), बारामती (जि.पुणे)) मंजुर करण्यात आले आहे. सदर महाविद्यालयांची एकूण प्रवेश क्षमता ७०४ एवढी असेल.

यव्यतिरीक्त प्रत्येक महसूली विभागात १ खाजगी विनाअनुदानीत पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याच्या अनुषंगाने जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. त्यानुसार भविष्यात राज्यात खाजगी विनाअनुदानीत पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु होणे अपेक्षीत आहे.

शासकीय महाविद्यालयामधून दरवर्षी पदवी प्राप्त करणारे विद्यार्थी आणि प्रस्तावित खाजगी विनाअनुदानीत महाविद्यालयातुन पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता, सद्यस्थितीत येरमाळा, (ता.कळंब, जि.धाराशिव) येथे पशुवैकीय महाविद्यालय स्थापन करण्याची आवश्यकता नाही.

---

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्याबाबत

**(१८) २४९६ (०८-०४-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळातील अपुऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येमुळे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन सदर महामंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०६-२०२५) :** (१) व (२) पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे यांचा आकृतीबंध शासन निर्णय दिनांक ०१.०६.२०१३ अन्वये निश्चित करण्यात आला आहे. शासन निर्णय दिनांक १०.१०.२०२४ अन्वये पशुसंवर्धन विभागाची बदलती भूमिका विचारात घेऊन विभागाची पुनर्रचना व सुधारित

आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. विभागाची पुनर्रचना करण्यात आली आहे. त्याधर्तीवर महामंडळाच्या शासन निर्णय दिनांक ०१.०६.२०१३ च्या आकृतीबंधाचा पुनर्विचार करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा (जि.लातूर) येथील पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाचे पुर्नरचनेस पदुम लेखा परीक्षण योजना पशुसंवर्धन विभागाकडे कायम संलग्न करण्याबाबत

**(१९) २८५५ (२७-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) येथील पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाचे पुर्नरचनेस पदुम लेखा परीक्षण योजना पशुसंवर्धन विभागाकडे कायम संलग्न करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी निवेदनान्वये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर मागणी पूर्ण करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ११/११/२००२ अन्वये दुग्धव्यवसाय क्षेत्रातून टप्प्याटप्प्याने बाहेर पडण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. शासकीय दूध योजनेअंतर्गत दुध संकलन व वितरण होत नाही. तसेच पशुसंवर्धन विभाग व दुग्धव्यवसाय विभागांची बदलेली भूमिका विचारात घेवून मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेने शासन निर्णय दिनांक १०/१०/२०२४ अन्वये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागांची पुनर्रचना करुन सुधारीत आकृतीबंध मंजूर केला आहे.

सहकार अधिनियमातील सुधारणेनुसार मान्यताप्राप्त लेखा परिक्षकांकडून सहकारी संस्थेचे लेखा परिक्षण करण्यास दिलेली अनुमती व पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे लेखापरिक्षण विषयक कामकाज विचारात घेवून आवश्यक तेवढ्या पदांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आला आहे.
(३) विलंब नाही.

---

## राज्यातील वडार समाजाच्या मागण्या मंजुरीबाबत

**(२०) २८७८ (२६-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वडार समाजाच्या मागण्या मंजुरीबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदय यांनी सचिव बहुजन कल्याण विभाग यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०७-०७-२०२५) :** (१) होय.
(२) मा. मुख्यमंत्री महोदयांनी तपासून प्रकरण सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.
(३) व (४) शासन निर्णय दिनांक ०९/०८/२०२३ अन्वये वडार समाजासाठी पैलवान कै.मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ या उपकंपनीची वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळांतर्गत स्थापना

करण्यास शासन मान्यता देण्यात आली असून कंपनी कायदा, २०१३ अन्वये दिनांक २०/०१/२०२४ रोजी स्थापना करण्यात आली आहे. तसेच, सदर उपकंपनीचे अधिकृत भागभांडवल रु.५० कोटी इतके मंजूर करण्यात आले असून, प्रत्येक वित्तीय वर्षात विविध योजना राबविण्यासाठी रु.५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर महामंडळ वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळांतर्गत कार्यरत असल्याने या महामंडळांतर्गत उपलब्ध असलेले अधिकारी / कर्मचारी यांचेकडून व काही अतिरिक्त कर्मचारी भरून कामकाज करण्यात येईल.

विभागाच्या अधिनस्त सर्व महामंडळे व उपकंपन्या यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या "वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजने" ची कर्ज मर्यादा रु.१० लाखांवरून रु.१५ लाखांपर्यंत वाढविण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १४/०५/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

दिनांक २९/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्ह्यात इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील १०० क्षमतेचे मुली व मुलांसाठी प्रत्येकी १ याप्रमाणे ७२ शासकीय वसतिगृहे सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यात आतापर्यंत ५४ वसतिगृहे सुरु करण्यात आली असून उर्वरित वसतिगृहे सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे. वडार समाज हा विमुक्त जाती या प्रवर्गामध्ये येत असल्याने सदर वसतिगृहांमध्ये वडार समाजाच्या पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो.

दिनांक २४/०१/२०१८ अन्वये यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत व दिनांक ३०/०१/२०२४ अन्वये मोदी आवास घरकुल योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात येते. वडार समाज हा विमुक्त जाती या प्रवर्गामध्ये येत असल्याने सदर योजनांतर्गत वडार समाजातील लाभार्थ्यांना घरकुल अनुज्ञेय आहे.

---

**राज्यातील महिलांवरील व बालकांवरील अत्याचार रोखण्याबाबत**

**(२१) २९१८ (२८-०४-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील तीन वर्षात २०२१ मध्ये ३९ हजार ५२६, २०२२ मध्ये ४५ हजार ३३१ तर २०२३ मध्ये ४७ हजार ३८१ महिला अत्याचाराच्या गुन्ह्यांची नोंद झाली आहे हे खरे आहे का

(२) असल्यास, राज्यात महिलांसोबत बालकांवरील गुन्ह्यांची वाढ होत असून २०२१ मध्ये १७२३२ वर्ष २०२२ मध्ये २०७६२ तर २०२३ मध्ये २१८०२ बालकांवर अत्याचार झाल्याबाबत गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) तसेच २०२१ ते २०२३ या तीन वर्षात राज्यात ३५४ बालकांचे खून झाले आहेत, हेही खरे आहे का

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने महिलांवरील बलात्काराच्या घटनांना आळा घालण्यासह बालकांवरील अत्याचार रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०२५) :** (१) राज्यातील महिला अत्याचाराबाबत सन २०२१, २०२२ व २०२३ मधील गुन्ह्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | सन | महिलांवर झालेल्या अत्याचाराबाबत गुन्हे |
|---|---|---|
| १. | २०२१ | ३९५२६ |
| २. | २०२२ | ४५३३१ |
| ३. | २०२३ | ४७१०१ |

(२) राज्यातील बालकांवरील सन २०२१, २०२२ व २०२३ मधील गुन्ह्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | सन | बालकांवर झालेल्या अत्याचाराबाबत गुन्हे |
|---|---|---|
| १. | २०२१ | १७२३२ |
| २. | २०२२ | २०७६० |
| ३. | २०२३ | २२३९० |

(३) राज्यात सन २०२१ ते २०२३ पर्यंत खून झालेल्या बालकांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | सन | बालकांवर अत्याचार करुन खून केलेले गुन्हे | बालकांचे खून झालेले गुन्हे |
|---|---|---|---|
| १. | २०२१ | ११ | १३५ |
| २. | २०२२ | १४ | ११० |
| ३. | २०२३ | ०८ | ९८ |

(४) महिला व बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये महिला पोलीस कक्ष, पोलीस स्टेशन स्तरावर महिला सुरक्षा समिती, महिला सहाय्य कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. महिला व बालकांवरील अत्याचारांची प्रकरणे निकाली काढण्याकरिता राज्यात विशेष न्यायालये व जलदगती न्यायालये स्थापन केले आहेत. तसेच सर्व पोलीस घटकांमध्ये विशेष बाल पोलीस पथके कार्यरत आहेत. हरविलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी राज्यात ऑपरेशन मुस्कान राबविण्यात येत आहे. अल्पवयीन मुलींवर होणारा अत्याचार रोखण्याकरिता पोलीस घटकांमध्ये पोलीस काका, पोलीस दिदी, निर्भया पथक, दामिनी पथक, भरोसा सेल कार्यरत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील नवीन वसतीगृहाच्या बांधकामाच्या प्रस्तावाबाबत

**(२२) २९९१ (०५-०५-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळे, सध्या अस्तित्वात असलेल्या वसतीगृहांची संख्या व क्षमता अपुरी पडत असून, २०० मुले व २०० मुलींसाठी वसतीगृह बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे.

(२) असल्यास, उक्त बांधकाम प्रस्तावाचे स्वरूप काय आहे आणि त्यासाठी किती रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकामाच्या अंमलबजावणीसाठी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१८-०६-२०२५) :** (१) सदर प्रस्तावा संदर्भात विद्यापीठ स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड व रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वसंतराव नाईक तांडावस्ती सुधार योजनेंतर्गत पंचवार्षिक बृहत आराखडा नव्याने तयार करणेबाबत

**(२३) ३१६८ (२५-०४-२०२५). अॅड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेचा पंचवार्षिक बृहत आराखडा सन २०१९-२०२० या वर्षात तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखडा सुमारे १४ वर्षापुर्वीच्या सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे तयार करण्यात आला असून दरम्यानच्या काळात झालेली लोकसंख्या वाढ विचारात घेता या बृहत आराखड्यामुळे नांदेड जिल्ह्यातील बरेचसे तांडे व वस्त्या विकासापासून वंचित रहात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त योजनेअंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यात धनगर समाजाच्या विकासासाठी ५ वर्षात निधी उपलब्ध न झाल्याने या योजनेंतर्गत पाठविलेले विकासकामांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेचा पंचवार्षिक बृहत आराखडा नव्याने तयार करण्याची व निधी वेळेत देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०३-०७-२०२५) :** (१) व (२) वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यासाठी सन २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीसाठी तयार करण्यात आलेल्या पंचवार्षिक बृहत आराखड्याची मुदत मार्च, २०२४ मध्ये संपुष्टात आली आहे. सन २०२४-२५ ते २०२८-२९ या कालावधीसाठी पंचवार्षिक बृहत आराखडा सन २०११ मधील लोकसंख्येमध्ये १०% वाढ गृहित धरुन तयार करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २०१८-१९ ते २०२४-२५ या कालावधीत रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण १४१ कामांना प्रशासकीय मान्यता व त्यांकरीता एकूण रु.१४.६५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सदरहू योजनेंतर्गत ज्या जिल्ह्यांच्या पंचवार्षिक बृहत आराखड्यांची मुदत संपुष्टात आली आहे त्यांनी नवीन पंचवार्षिक बृहत आराखडे तातडीने तयार करण्याच्या सूचना दिनांक २८.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

---

## राज्यातील बहुतांश जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२४) ३१७४ (२७-०४-२०२५). अॅड.श्रीजया चव्हाण (भोकर), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची पदे मागील अनेक वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय, राज्य महामार्ग तसेच तपासणी नाके या ठिकाणी वाहन तपासणीसाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांचा आढावा घेवून पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०२-०७-२०२५) :** (१) नाही.

(२), (३) व (४) सद्यस्थितीत प्रादेशिक परिवहन अधिकारी या सवंर्गातील २८ मंजूर पदांपैकी २७ पदे भरलेली असून १ पद रिक्त आहे.

मोटार वाहन अधिनियम व त्याअनुषंगाने असलेल्या नियमानुसार रस्ता सुरक्षा संदर्भात अंमलबजावणी करण्याकरीता राष्ट्रीय, राज्य महामार्ग तसेच तपासणी नाके या ठिकाणी वाहन तपासणीसाठी मोटार वाहन निरिक्षक व सहायक मोटार वाहन निरीक्षक कार्यरत असतात.

---

**राज्यातील साखर कारखान्यांना इथेनॉल निर्मितीस प्रोत्साहन मिळण्याबाबत**

**(२५) ३१७७ (०५-०५-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखर उत्पादनात महाराष्ट्र राज्य हे देशामध्ये अग्रस्थानी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील साखर उद्योगात तयार होणाऱ्या पूरक पदार्थांपासून इथेनॉल निर्मितीसाठी आवश्यक तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा वा प्रक्रिया यांची पुरेशी व्यवस्था उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साखर उद्योगास नैसर्गिक आपत्ती, प्रदूषण व आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, त्या उद्योगाच्या शाश्वततेसाठी इथेनॉल निर्मितीवर भर देण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, इथेनॉल निर्मितीला चालना देण्यासाठी राज्य शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (१८-०६-२०२५) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) साखर उद्योगाच्या शाश्वततेसाठी इथेनॉल निर्मितीवर भर देण्याकरीता शासनाने केलेल्या उपाययोजना खालीलप्रमाणे-

साखर उद्योगाच्या शाश्वततेसाठी इथेनॉल निर्मितीवर भर देण्याकरीता केंद्र शासनाकडून इथेनॉल मिश्रित पेट्रोल कार्यक्रम (EBP) राबविण्यात येत आहे.त्यामुळे भारताचे जीवाश्म इंधनावर अवलंबून राहण्याचे प्रमाण कमी झाले असून हरितगृह वायू उत्सर्जनात घट झालेली आहे.

साखर कारखान्यांना इथेनॉल निर्मितीकरीता प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनाने दिनांक १९.०७.२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये Scheme for extending financial assistance to sugar mills for enhancement and augmentation of ethanol production capacity ही योजना लागू केली आहे. त्याद्वारे आसवनी असलेल्या कारखान्यांना प्रकल्प क्षमता वाढविण्यासाठी व झिरो लिक्विड डिस्चार्ज सिस्टिम निर्माण करण्यासाठी बॉयलर बसविणे तसेच नवीन आसवनी प्रकल्प उभारण्यासाठी बँकाकडून घेतलेल्या कर्जावर प्रतिवर्षी ६% दराने किंवा बँकानी आकारलेल्या व्याजदराच्या ५०% यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम अनुदान रुपाने केंद्रशासनाकडून ५ वर्षासाठी देण्यात येते.

केंद्र शासनाने "सहकारी साखर कारखान्यांना (सीएसएम) त्यांच्या विद्यमान ऊस आधारित फीडस्टॉक इथेनॉल प्रकल्पांचे मका आणि खराब झालेले अन्नधान्य (डीएफजी) यांसारख्या धान्यांचा वापर करून बहु-फीडस्टॉक आधारित प्रकल्पांमध्ये रूपांतरित करण्यासाठी इथेनॉल उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी आणि वृद्धीसाठी "आर्थिक सहाय्य योजना" दिनांक ०६.०३.२०२५ रोजीच्या अधिसुचनेव्दारे जाहीर केली आहे.

सदर योजनेअंतर्गत प्रकल्प प्रस्तावकांनी घेतलेल्या कर्जावर पाच वर्षांसाठी प्रतिवर्ष ६% व्याज उपदान किंवा बँका / राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एनसीडीसी) / भारतीय नवीकरणीय ऊर्जा विकास संस्था मर्यादित (आयआरईडीए) बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्या (एनबीएफसी) / नाबार्डकडून पुनर्वित्तासाठी पात्र असलेल्या इतर कोणत्याही वित्तीय संस्थांनी

आकारलेल्या व्याजदराच्या ५०%, यापैकी जे कमी असेल, अनुदान रुपाने केंद्र शासनाकडून ५ वर्षांपर्यंत देण्यात येणार आहे.

इथेनॉल उत्पादन, साठवण आणि वितरणासाठी पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक केली जात आहे.तेल कंपन्यांना इथेनॉल देशांतर्गत उत्पादकाकडून निश्चित किंमतीवर खरेदी करणे बंधनकारक आहे. तसेच इथेनॉलवरील वस्तू व सेवा कर १८% वरुन ५% पर्यंत कमी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मांजरा व तेरणा (जि.लातूर) नदीवरील बॅरेजच्या दुरुस्ती कामांबाबत**

**(२६) ३१८४ (२३-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांजरा व तेरणा (जि.लातूर) नदीवरील बॅरेजच्या दुरुस्ती कामांबाबतचे निवेदन औसा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री महोदयांना यांना दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने अद्यापपर्यंत कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०६-२०२५) :** (१) होय.

औसा जि. लातूर येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लातूर जिल्ह्यातील मांजरा व तेरणा नदीवरील बॅरेजच्या विशेष दुरूस्ती कामांबाबत दिनांक १७.०१.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केली आहे.

(२) नाही.

मांजरा, तेरणा व रेणा नदीवरील एकूण २२ बॅरेजेसच्या यांत्रिकी व विद्युत घटकांच्या विशेष दुरूस्तीची अंदाजपत्रके शासनास प्राप्त असून सदर अंदाजपत्रके मान्यतेच्या विविध टप्प्यावर प्रगतीत आहेत. तसेच स्थापत्य कामांची आवश्यकता तपासून महामंडळ स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आर्थिक अडचणीत असल्याबाबत**

**(२७) ३२५२ (०५-०५-२०२५). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस आर्थिक अडचणीतून वाचविण्यासाठी प्रशासनाने ६३५ कोटीच्या शेअर्स कॅपिटलचा अंतिम प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्हा बँकेने सादर केलेल्या ६३५ कोटीच्या प्रस्तावास मंजुरी देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (१७-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भागभांडवल स्वरुपात शासकीय अर्थसहाय्य मंजूर करणे ही बाब धोरणात्मक असल्याने सदर प्रस्ताव मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूरी चादर व्यवसाय अडचणीत आल्याबाबत

**(२८) ३३७३ (०५-०५-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूरी चादर म्हणजे भौगोलिक मानांकन (जी आय) मिळालेले उत्पादन ६० च्या दशकापासून देशभर पोहचले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सोलापूरी चादर ही एकमेकात गुंतलेल्या धाग्यानीशी बनलेल्या विशिष्ट आणि सुबक नक्षीकाम असलेल्या व्यवसायांपैकी सुप्रसिध्द असून गेल्या काही दिवसांपासून शासनाच्या धोरणाचा परिणाम म्हणून चादर व्यवसायाला घरघर लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूरी चादरप्रमाणे हुबेहूब दिसणारी व दर्जाहीन चादरी देशाच्या अन्य भागातून येत असल्यामुळे येथील ३० टक्के कामगारांनी स्थलांतर केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील हा व्यवसाय वाचविण्यासाठी तसेच कामगारांचे हित जोपासण्यासाठी व उद्योग सुरू ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय सावकारे (१५-०५-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सोलापूर चादरीचे उत्पादन यंत्रमागावर सुरु आहे. बाजारपेठेतील मागणीनुसार टर्कीश टॉवेलच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने सोलापूर चादरीच्या उत्पादनात घट झालेली आहे.

(४) राज्य शासनाने वस्त्रोद्योग धोरण सन २०११-२०१७ व २०१८-२०२३ जाहीर केले होते. तसेच शासनाने एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण सन २०२३-२०२८ शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०२३ अन्वये जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये ५ वर्षात २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक व ५ लाख रोजगार निर्मितीबाबत उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणांतर्गत वस्त्रोद्योग घटकांना विविध योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औद्योगिक वसाहतीमध्ये आधुनिक अग्निशमन यंत्रणा उभारण्याबाबत

**(२९) ३६१० (०५-०५-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सद्य:स्थितीत वस्त्रोद्योगामध्ये आग लागल्यास ती विझविण्यासाठी अग्निशमन दलाकडून पाण्याचा वापर करण्यात येत असल्यामुळे उद्योजकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्नीशमन दलामध्ये फायर बॉल, फोम पावरड स्प्रे इत्यादी प्रकारची नविन अधुनिक यंत्रसामुग्री आलेली असून त्याचा वापर वस्त्रोद्योगामध्ये आगीच्या घटना घडल्यास अग्निशमन दलाकडून करण्यात यावा अशी मागणी उद्योजकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील यंत्रमागधारकांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या यंत्रमाग अभ्यास समितीने शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये वरील सर्व गोष्टींचा समावेश केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अहवालातील शिफारशींनुसार व वस्त्रोद्योगातील व्यापाऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने नवीन आधुनिक अग्निशमन यंत्रसामुग्रीची उपलब्धता करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय सावकारे (१५-०५-२०२५) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

राज्यातील स्थानिक नागरी स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे यांचेकडे उपलब्ध असलेल्या अग्निशमन वाहनांवर पाणी हे आग विझविण्यासाठी मुख्य साधन उपलब्ध असते. तसेच रासायनिक आगीवर त्वरीत नियंत्रण मिळविण्यासाठी फोम व ड्राय केमिकल पावडर याचा देखील अग्निशमन सेवांकडून वापर केला जातो. आगीच्या प्रमाणावर व ती पसरण्याचे धोके लक्षात घेऊन अग्निशमन सेवांकडून ती विझविण्यासाठी किंवा त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी पाणी, फोम व ड्राय केमिकल पावडर इत्यादी साधनांचा वापर करण्यात येतो. पाण्याच्या वापरामुळे वस्त्रोद्योगामध्ये नुकसान होऊ शकते.

(२), (३) व (४) अशा प्रकारची मागणी प्राप्त नाही. तथापि, पाण्याचा कमीत कमी वापर करुन आग नियंत्रणात आणण्यासाठी वॉटर मिस्ट तसेच फोम स्प्रे इत्यादी आधुनिक सामुग्री असलेली अग्नि वाहने घेण्याचे काम टप्प्याटप्प्याने सुरु असून भविष्यात सर्व स्थानिक नागरी स्वराज्य संस्थामध्ये अशा प्रकारची अग्निवाहने नगर विकास विभागामार्फत उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यातील यंत्रमाग धारकांच्या समस्यांचा अभ्यास करुन त्यावर उपायोजना सुचविण्यासाठी गठीत समितीच्या अहवालातील शिफारस क्रमांक ३.१९ (आपातकालीन व्यवस्था) नुसार राज्यात वस्त्रोद्योग व्यवसाय असणाऱ्या ठिकाणी अग्निशमन दलाची स्थापना करण्यात यावी, जेणे करुन या उद्योगात आग लागल्यामुळे होणारे मोठे आर्थिक नुकसान टाळता येईल, अशी शिफारस केली आहे.

उपरोक्त प्रमाणे समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत नगर विकास विभागास वस्त्रोद्योग विभागामार्फत दिनांक ७ जून, २०२४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अभियांत्रिकी विभागाच्या परदेशी इराकी विद्यार्थ्याचे परीक्षेतील गुण वाढविल्याबाबत

**(३०) ३६२५ (०५-०५-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे अभियांत्रिकी विभागाच्या २०१९ पॅटर्नच्या अभ्यासक्रमात संगणक शाखेच्या शेवटच्या वर्षात शिकणाऱ्या श्री.अब्बास हमीद या इराकी परदेशी विद्यार्थ्याचा डायरेक्ट रिचेकिंग लिंक ओपन झाली नसतानाही १२ दिवसांपूर्वीच परीक्षा संचालक मार्फत रविवार २० जुलै, २०२३ रोजी नियमबाह्यरीत्या फॉर्म भरून घेतला असल्याची धक्कादायक बाब माहे जुलै, २०२३ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च व तंत्र शिक्षण संचालक कार्यालयातील दबावापोटी नियमबाह्यरित्या सदर इराकी विद्यार्थ्यांचे पेपर परीक्षा विभागामार्फत गठ्ठ्यातून काढून AISSMS या संस्थेच्या बहिस्थ पेपर तपासणी करणाऱ्या शिक्षकासमोर इराकी विद्यार्थ्यांचा पुन्हा पेपर लिहून बारकोड बदलला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वरिष्ठांनी उच्च व तंत्र शिक्षण संचालक कार्यालयातील दबावापोटी सदर विद्यार्थ्याचे पूर्वीचे १३, १४ नापास असलेले मार्क बदलून त्यास वाढीव ३३, ३४ मार्क्स देण्यात येऊन परीक्षा विभागातील दुसऱ्या कर्मचाऱ्याचे लॉगीन आय डी, पासवर्ड वापरून परस्पर नियमबाह्यरित्या उत्तीर्ण असल्याची मार्कलिस्ट देऊन सदर विद्यार्थ्यास परदेशात धाडण्यास मदत केली, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर इराकी विद्यार्थी आठ वर्षे भारतात शिकत असताना अभ्यासक्रम बदलताना जुना कोर्स (ओल्ड कोर्स) ते नवीन कोर्स (न्यू कोर्स) मध्ये बदल करताना नियमबाह्यरित्या परस्पर क्रेडीट ट्रान्स्फर करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर परदेशी इराकी विद्यार्थ्याचे परीक्षेतील गुण वाढविल्याच्या गैरकारभाराची चौकशी करणेबाबत सावित्रीबाई पुणे विद्यापीठच्या मा. कुलगुरू यांना दिनांक २३ जुलै, २०२३ रोजी सिनेट सदस्य यांनी लेखी पत्राद्वारे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर परदेशी इराकी विद्यार्थ्याचे परीक्षेतील गुण वाढविल्याच्या गैरकारभारातील दोषींवर शासन स्तरावर त्रयस्थ उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१७-०६-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

श्री. अब्बास हमीद हे महाराष्ट्र इन्स्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी पुणे या महाविद्यालयातील अभियांत्रिकी शाखेतील बी.ई कॉम्पुटर या अभ्यासक्रमाच्या Business Intelligence या विषयाचा मार्च / एप्रिल २०२३ चा परीक्षार्थी होते. सदर विद्यार्थ्याचा निकाल दिनांक २०/०७/२०२३ रोजी जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत मिळण्यासाठी दिनांक २२/०७/२०२३ रोजी नियमानुसार अर्ज केला होता. सदर विद्यार्थ्यांचा भारतात राहण्याचा परवाना (Visa) दिनांक २६/०७/२०२३ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे त्याच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनाची प्रक्रिया त्वरीत करावी यासाठी त्यांनी विद्यापीठाच्या कुलगुरू यांना समक्ष भेटून विनंती केली होती. त्यास अनुसरून विद्यार्थ्याचे हित लक्षात घेवून प्रचलित नियमित पध्दतीने विद्यापीठाच्या अध्यादेश क्र. १८४ नुसार फोटोकॉपी करीता (छायांकित प्रत) ऑनलाईन फॉर्म भरून घेण्यात आला. विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने मान्य केल्यानुसारच पुनर्मूल्यांकनाचे काम उत्तरपत्रिकांचे पुर्ण गुणांवर आच्छादन करून परीक्षकांकडून तपासणी करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.

अभियांत्रिकी शाखेतील मूल्यमापनासाठीचे संबंधित समन्वयक यांचे कडून बी.ई संगणक शाखेतील Business Intelligence या विषयाच्या परीक्षकाचे नाव मागवून घेण्यात आले. त्यानंतरच संबंधित परीक्षकांकडे इतर विषयांच्या उत्तरपत्रिकासह संबंधित विद्यार्थ्याची त्याच्या विषयाची उत्तरपत्रिका पुनर्मूल्यांकनासाठी देण्यात आली. संबंधित परीक्षकाने उत्तरपत्रिकेचे पुर्नमूल्यांकन केल्यानंतर सादर केलेल्या पुनर्मूल्यांकनाच्या गुण तक्त्यानुसार संबंधित विद्यार्थ्यास पुर्वीच्या प्राप्त १७ गुणांमध्ये वाढ होवून ३३ गुण मिळाल्याचे दिसून आले. त्यानुसार सदर निकाल जाहिर करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली व सदर बाब पुढील कार्यवाहीसाठी विद्यापीठाच्या छाननी व तालिनिकरण कक्षास कळविण्यात आली.
(४) हे खरे नाही.

ज्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परदेशात जायचे असते, परराज्यात नोकरीसाठी जायचे असते, ज्या विद्यार्थ्यांच्या Visa च्या अंतिम तारखेची अडचण असते अशा विद्यार्थ्यांना डिग्री, डुप्लीकेट डिग्री ट्रान्सिक्रिप्ट, मार्कशिट इत्यादी विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेवूनच त्वरीत देण्याचा प्रयत्न असतो. सदर विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित लक्षात घेवून नियमित पद्धतीनेच व नियमास धरून छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची कार्यवाही विद्यापीठामार्फत पूर्ण करण्यात आली आहे.
(५) हे खरे आहे.
(६) उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता प्रश्न उद्‌भवत नाही.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथील रुग्णालयांमध्ये दुचाकी पार्किंग मोफत उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३१) ३८८० (२९-०४-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील सह्याद्री रुग्णालय, पुना रुग्णालय, जहांगीर रुग्णालय व रुबी क्लिनिक इत्यादी रुग्णालयांमध्ये शासनाच्या नियमानुसार दुचाकी पार्कींग मोफत असणे अपेक्षित असताना सदर सर्व रुग्णालयाच्या प्रशासनाने दुचाकी पार्कींगकरीता पैसे आकारुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धर्मादाय आयुक्तालयाच्या नियंत्रण अंतर्गत पुणे शहरात नोंद झालेल्या सर्व रुग्णालयांपैकी दिनानाथ रुग्णालयामध्ये दुचाकी करिता मोफत पार्कींग सुरु असणे आवश्यक असतांना नागरिकांकडून दुचाकी पार्कींग करीता पैसे

आकारल्याने सदर प्रकरणी नागरिकांनी तक्रारी दाखल करुनही रुग्णालय व्यवस्थापन त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धर्मादाय आयुक्त, मनपा, शासन, यांच्याकडून विविध सोयी व सवलती रुग्णालय प्रशासन घेत असून नागरिकांकडून पैसे घेवून लाखो रुपयांचा नफा कमवत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सर्व रुग्णालय व्यवस्थापनाविरुद्ध कारवाई करण्यासह शासनाचे नियमांचे पालन न केल्याबद्दल कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

पुणे शहरातील सह्याद्री रुग्णालय, पुना रुग्णालय, हे संस्था /न्यासांमार्फत चालविले जातात. रुग्णालयांच्या प्रशासनाने दुचाकी पार्कींग करीता पैसे आकारुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला याबाबतची कोणत्याही प्रकारची लेखी तक्रार न्यासाविरुध्द अथवा रुग्णालयाविरुध्द माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) लागू नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक येथील विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था संकुल स्थापन करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

**(३२) ४२९० (२७-०४-२०२५). अॅड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक रोड (ता.जि.नाशिक) येथील विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण सस्था संकुल स्थापन करण्याचे नियोजित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था संकुलाच्या बांधकाम प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्र्याना वारंवार पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने अप्पर मुख्य सचिव सेवा, सामान्य प्रशासन यांनी विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, नाशिक या संस्थेच्या नवीन संकुल बांधकामाच्या १२२.२५ कोटी इतक्या रकमेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकातील स्थापत्य कामाच्या सर्वसाधारण वर्णनानुसार नमूद बाबी संदर्भात फेरविचार करून सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, नाशिक यांना आदेश देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था नाशिक व सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांनी सुधारित बांधकाम प्रस्ताव माहे ऑक्टोंबर २०२४ मध्ये शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग (सेवा) यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था संकुलाचे स्थापन करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) व (६) प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता करुन सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत संस्थेस कळविण्यात आले आहे.

---

**सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, मंगळवेढा, माढा व मोहोळ या तालुक्यामध्ये उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर करण्याबाबत**

**(३३) ४६७६ (०८-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, मंगळवेढा, माढा व मोहोळ या तालुक्यामध्ये मोठया प्रमाणात शहरीकरण वाढत असल्याने याठिकाणी उपप्रादेशिक परिवहन (आर.टी.ओ.) कार्यालय मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन उपप्रादेशिक परिवहन (आर.टी.ओ.) कार्यालय मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०४-०७-२०२५) :** (१) होय.

(२) शासन निर्णय दिनांक १८.०६.२०१८ अन्वये विहित केलेल्या निकषानुसार एखाद्या जिल्ह्याचे विभाजन झाल्याशिवाय स्वतंत्र परिवहन कार्यालय स्थापन न करण्याचे शासनाचे धोरण आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यात दुग्धउत्पादन वाढविण्यासाठी बंद पडलेल्या डेअरी व दूध शितकेंद्र पुनर्जिवीत करण्याबाबत**

**(३४) ४९२५ (२५-०४-२०२५). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.प्रविण तायडे (अचलपूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात इतर जिल्ह्यापेक्षा दुग्ध उत्पादन कमी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती विभागातील बुलढाणा जिल्ह्यातील चिखली, मोताळा व नांदुरा येथील शासकीय दूध शितकरण केंद्र बंद पडली असल्याने तेथील दुग्धउत्पादनात घट झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंचनासोबतच शेतीपूरक व्यवसाला चालना देण्यासाठी दुग्धउत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात परंतू अमरावती विभागातील बुलढाणा जिल्ह्या यापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन दुग्धउत्पादन वाढविण्यासाठी, बंद पडलेल्या डेअरी व दूध शितकेंद्र पुनर्जिवीत करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१९-०६-२०२५) :** (१) अमरावती जिल्ह्यात (सहकार व खाजगी) दैनंदिन दुध संकलन ३७५०० लिटर इतके आहे.

(२) अमरावती विभागातील बुलढाणा जिल्ह्यातील चिखली व मोताळा येथे दूध शितकरण केंद्र व नांदुरा येथे शासकीय दूध डेअरी कार्यरत होती. सद्यस्थितीत तीनही केंद्राचे कामकाज बंद आहे. परंतु, बुलढाणा जिल्ह्यात अमर डेअरी बोदवड, मदर डेअरी (मलकापूर, खामगाव), ग्रिनपर्ल डेअरी दुसरबीड, राजमाता डेअरी सिंदखेड राजा, सरस्वती मिल्क पो.के. दानापूर व जळगाव जिल्हा दुध उत्पादक सहकारी संघ या प्रकल्पांमार्फत दुधाचे संकलन करण्यात येत आहे. माहे जानेवारी, २०२५ मध्ये प्रतिदिन सरासरी १४७००० लिटर दुधाचे संकलन केले असून सदर दुधाला ३.५ फॅट व ८.५ एसएनएफ या गुणप्रतीसाठी प्रतिलिटर रु.३०/- व रु.३१/- दर दिला जात आहे.

| वर्ष | बुलढाणा जिल्ह्यात प्रतिदिन सरासरी दूध संकलन (लिटर) |
|---|---|
| सन २०२१-२२ | २३५०० |
| सन २०२२-२३ | २५००० |
| सन २०२३-२४ | १४१००० |
| सन २०२४-२५ | १४७००० |

(३) हे खरे नाही.

कृषि व पदुम विभागाच्या अनुक्रमे दिनांक ०५.०७.२०२४, दिनांक १२.०७.२०२४ व दिनांक २६.०९.२०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर रु.५/- आणि रु.७/- अनुदान योजना जाहीर केली आहे. दूध अनुदान योजनेत सहभाग घेतलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ दिला जात आहे. दिनांक ०५.०७.२०२४, दिनांक १२.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार माहे जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर २०२४ करिता रु.५/- प्रतिलिटर दूध अनुदानासाठी रु.३०,८३,०८०/- रक्कम बुलढाणा जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात DBT द्वारे जमा करण्यात आली आहे. तसेच माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०२४ करिता रु.७/- प्रतिलिटर दूध अनुदानासाठी रू.४९,७६,८१८/- रक्कम बुलढाणा जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात DBT द्वारे जमा करण्यात आली आहे.

(४) कृषि व पदुम विभागाच्या दिनांक ११.११.२००२ च्या शासन निर्णयान्वये दुग्धव्यवसायात खाजगी व सहकार क्षेत्राचा वाढता सहभाग विचारात घेऊन शासनाने दुग्धव्यवसायातून टप्प्याटप्प्याने बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यातील चिखली, मोताळा व नांदुरा येथील शासकीय दूध शितकरण केंद्र पुनर्जिवित करण्याचा कोणताही प्रस्ताव सद्यस्थितीत विचाराधीन नाही.

राज्यात पशुसंवर्धन विभागांतर्गत विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प टप्पा-२ ची अंमलबजावणी सुरु आहे. या प्रकल्पाअंतर्गत राज्यातील दुध साठा व वितरण विचारात घेऊन बंद पडलेल्या दूध डेअरी व दूध शितकेंद्राचा वापर करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी गावची उपसा सिंचन योजना निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३५) ४९८३ (०१-०५-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी ३५ गावातील उपसा सिंचन योजना गेल्या अनेक वर्षापासून निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी तत्कालिन मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १० सप्टेंबर, २०२३ रोजी पत्रव्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपसा सिंचन योजनेस निधी उपलब्ध करुन देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त योजनेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२९-०५-२०२५) :** (१) मंगळवेढा (जि.सोलापूर) उपसा सिंचन योजनेस दि.१४.३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये नव्याने देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेमध्ये मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी भागातील २४ गावांचा समावेश करण्यात आला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मंगळवेढा उपसा सिंचन योजना, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर या योजनेस दि.१४ मार्च, २०२४ रोजी नव्याने प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानंतर सन २०२४-२५ च्या पावसाळी अधिवेशनात लाक्षणिक तरतूद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सदर प्रकल्पासाठी सन २०२५-२६ च्या आखणीमध्ये पुरेशी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर जिल्ह्यातील कुही-नागपूर मुख्य मार्गावरील रस्त्यावर मृतदेह आढळून आल्याबाबत

**(३६) ५२०६ (२५-०४-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील कुही-नागपूर मुख्य मार्गावरील गावंडे क्रेशर शेजारील रस्त्यावर श्री.मुन्नासिंग विश्वनाथ उईके या व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर व्यक्तीस त्याचा मित्र जयदीप कुमरे याने दगडाने ठेचून मारले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई कली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०२५) :** (१) व (२) होय, खरे आहे.
(३) व (४) मृतकाच्या मुलाने दिलेल्या फिर्यादीवरुन कुही पोलीस ठाणे, नागपूर ग्रामीण येथे दिनांक ३१.०१.२०२५ रोजी आरोपीविरुध्द गु.र.नं.३५/२५ भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीबाबत सखोल चौकशी करुन आरोपीस ताब्यात घेऊन अधिक विचारपूस केल असता, आरोपी याचा मृतकासोबत शुल्लक कारणावरुन वाद झाला होता. सदर वादानंतर आरोपीने मृतकास धक्का देऊन रोडच्या बाजूला असलेल्या नालीमध्ये पाडून मृतकाचे डोके दगडाने ठेचून खून केल्याचे कबूल केल्यानंतर आरोपीस दिनांक ०१.०२.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. सद्यस्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्ह्याचा तपास पुर्ण झाला असून दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत धनगर समाजातील लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्याबाबत

**(३७) ५२२२ (२५-०४-२०२५). श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेअंतर्गत भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील लाभार्थ्यांना घरकूल मिळणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील धनगर समाजातील अनेकांना या योजनेचा लाभ मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(३) तसेच उक्त योजनेंतर्गत पंचायत समिती, गंगाखेड (जि.परभणी) अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त ९०३ पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी सादर केला असून त्यास मंजूरी देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्ताव मंजूर करुन धनगर समाजातील लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०३-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील २०४५ वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांना कार्योत्तर मान्यता व त्यांकरीता एकूण रु.२५,५२,१६,०००/- इतक्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. सदरहू घरकुलांना सद्य:स्थितीत रु.६,२९,७३,२००/- इतका निधी वितरीत करण्यात आला असून उर्वरित निधी योजनेंतर्गत उपलब्ध होणाऱ्या आर्थिक तरतूदीनुसार वितरीत करण्यात येणार आहे.
(३) व (४) मा.लोकप्रतिनिधींनी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने, शासन परिपत्रक दिनांक १२.१२.२०२४ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एसटी महामंडळातील कर्मचारी एक दिवसाच्या संपात सहभागी झाल्यामुळे गैरहजेरीपोटी तीन दिवसाचे वेतन कपात केल्याबाबत

**(३८) ५२४३ (२५-०४-२०२५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांनी सन २०२४ मध्ये त्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी संप केला असून या संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांना एक दिवसाच्या गैरहजेरीपोटी तीन दिवसाचे वेतन गमवावे लागणार असून या संदर्भातील निर्देश एसटी महामंडळाच्या उपव्यवस्थापकांनी सर्व विभाग नियंत्रकांना देण्यात आले असल्याची माहिती माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०३-०७-२०२५) :** (१), (२) व (३) सदर संपामध्ये सहभागी झालेल्या रा. प. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून वेतन कपातीबाबत कोणत्याही सुचना प्रसारीत करण्यात आलेल्या नाहीत.

---

## बाळापूर (जि.अकोला) येथील जोगलखेड ग्रामपंचायत अंतर्गत अडोशी येथील शासकीय इमारतीचे साहित्य चोरीला गेल्याबाबत

**(३९) ५३५७ (०१-०५-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर (जि.अकोला) येथील जोगलखेड ग्रामपंचायत अंतर्गत अडोशी येथील ठेकेदार यांनी जे.सी.बी. मशिनच्या सहाय्याने शासकीय इमारत पाडली असल्याचे दिनांक २७ जुलै, २०२४ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री दिलीप क्षिरसागर व श्री.रणजित गोपाल गावंडे यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०२४ रोजी इमारतीतील साहित्याची चोरी केल्याची तक्रार दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी तसेच सरपंच, ग्रामपंचायत जोगलखेड ता.बाळापुर जि.अकोला, उरळ पोलीस स्टेशन तसेच मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, गृह विभाग यांच्याकडे दिनांक २३ जानेवारी, २०२५ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाळापूर पं.स. चे गटविकास अधिकारी यांनी ग्रामविकास अधिकारी जोगलखेड यांना सदर प्रकरणी पत्र देऊन कार्यवाही करण्याबाबत पोलीस अधीक्षक अकोला, उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उरळ येथील ठाणेदार गोपाल ढोले हे गैरअर्जदारांना पाठीशी घालण्याचे कार्य करीत असल्याने गैरअर्जदारांवर क्र. १ वर ३५३. ३३२, २९४, ५०६, ३४, ३, ३ (५), ३२४ (३), २९६, ३५२, ३५१ (२) अन्वये गुन्हे दाखल असून तसेच गैरअर्जदार हे गुंड प्रवृत्तीचे असून पोलीसांना सुद्धा जुमानत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी महिला सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण करणे, खोटया तक्रारी करणे हा त्यांचा व्यवसाय असून जिल्हा पोलीस अधीक्षक व पोलीस उपविभागीय अधिकारी बाळापूर यांच्याकडे गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीविरुद्ध कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०२५) :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

(४), (५) व (६) गैरअर्जदारांना पाठिशी न घालता दिनांक ०७.०९.२०२४ रोजी तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्याच दिवशी गैरअर्जदारांवर भारतीय न्याय संहिता कलम ३३२४(३), ३(५) सह सार्वजनिक संपत्ती विद्रुपिकरण कायदा कलम (३) अन्वये गु.र.क्र. ३०७/२०२४ दाखल करण्यात आला असून प्रकरणी मा. न्यायालयामध्ये आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सदर आरोपीस जामीन मंजूर झाला असल्याने भारतीय नागरित सुरक्षा संहितेचे कलम १२९ प्रमाणे उपविभागीय दंडाधिकारी, बाळापुर यांच्या न्यायालयात प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

---

## पुणे ते अहिल्यानगर या थेट रेल्वे मार्गाचे काम सुरु करण्याबाबत

**(४०) ५७५४ (२७-०४-२०२५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्हयातील बहुचर्चित व कनेक्टीव्हीटी वाढवणारा तसेच विकासाला गती देणारा पुणे ते अहिल्यानगर थेट रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणास केंद्रीय रेल्वे मंत्री यांनी मान्यता दिली असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे,

(२) असल्यास, या रेल्वे मार्गासाठीचा डी.पी.आर. महाराष्ट्र रेल्वे पायाभुत सुविधा विकास मंडळाने तयार केला असून शासन ५० टक्के व रेल्वे मंत्रालय ५० टक्के असा हा संयुक्त उपक्रम करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे ते अहिल्यानगर या थेट रेल्वे मार्गाचे काम प्रत्यक्ष सुरु करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०२-०७-२०२५) :** (१) व (२) अंशत: बरोबर.

पुणे ते अहिल्यानगर थेट नवीन दुहेरी ब्रॉड गेज रेल्वे मार्गासाठी अंतिम स्थान सर्वेक्षण रेल्वे बोर्डाने दिनांक २६.०२.२०२४ रोजी मंजूर केले असून फिल्ड आणि ट्रॅफिक सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मध्य रेल्वेकडून तयार केला जात असून तो रेल्वे बोर्डाला जुलै, २०२५ मध्ये सादर करण्याचे लक्ष आहे.

अद्याप सदर रेल्वे मार्ग प्रकल्पाला राज्य शासन व केंद्र शासनाने मंजुरी दिलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील धरणांची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत

**(४१) ५८३६ (३०-०४-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस पाण्याची पातळी कमी होत असल्याने राज्यशासनाने पाणी साठवण्यासाठी लहान-मोठे धरणांची बांधकामे केलेली असून त्यापैकी काही धरणे कार्यान्वित असून उर्वरीत धरणांची कामे प्रलंबित असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण विभागात जून महिन्यामध्ये मुसळधार पावसाला सुरूवात झाल्यानंतर परिणामी येथील जनजीवन विस्कळीत होऊन गावांचा संपर्क तुटतो व नदी-नाले धोक्याच्या पातळीच्या वर तुडूंब भरून वाहत असूनही दरवर्षी जानेवारी वर्षाच्या सुरूवातीपासून पाणी टंचाईचा सामना कोकणातील नागरिकांना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उन्हाळयात टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा लागत असून याबाबत पाण्याचे नियोजन करण्यासाठी शासनाकडे लोकप्रतिनिधींनी तसेच येथील ग्रामस्थांनी वारंवार निवेदन देवूनही प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोकणाच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे नियोजन करण्यासह प्रलंबित धरणांची कामे करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२९-०५-२०२५) :** (१) राज्यात १०२ मोठे, ३०५ मध्यम व ३२२९ लघु असे एकूण ३६३६ सिंचन प्रकल्प असून त्यापैकी ४० मोठे, २३८ मध्यम व ३११७ लघु असे एकूण ३३९५ सिंचन प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

उर्वरित ६९ मोठे, ६५ मध्यम व ११० लघु असे एकूण २४४ प्रकल्प बांधकामाधीन आहेत.

पूर्ण व बांधकामाधीन प्रकल्पांचा प्रकल्पीय पाणीसाठा एकूण १८६७ टीएमसी इतका असून १५६१ टीएमसी इतका पाणीसाठा निर्माण करण्यात आला आहे.

जलसंपदा विभागाकडील उपलब्ध आकडेवारीनुसार मागील ५ वर्षात (सन २०१८-१९ ते २०२२-२३) खरीप हंगामा अखेर धरणातील उपयुक्त पाणीसाठा खालील प्रमाणे आहे.

| **वर्ष** | **२०१८-१९** | **२०१९-२०** | **२०२०-२१** | **२०२१-२२** | **२०२२-२३** |
|---|---|---|---|---|---|
| **पाणीसाठा (TMC)** | ८१२ | १०६३ | १२०९ | १२१६ | १२१८ |

उपरोक्त उपयुक्त पाणीसाठा हा त्या-त्या वर्षी होणाऱ्या पर्जन्यमानावर अधारित आहे.

उर्वरित धरणांची/प्रकल्पांच्या कामांना प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, बळीराजा जलसंजीवनी योजना, नाबार्ड-RIDF कर्ज सहाय्य, नाबार्ड अंतर्गत NIDA कर्ज सहाय्य इ. विविध माध्यमातून तसेच शासन अंशदानातून राज्याच्या अर्थोपायाच्या स्थितीनुसार/ निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) अंशत: खरे आहे.

कोकणातील प्रकल्पात पावसाळा कालवधित पूर्ण क्षमतेने पाणी साठा केला जातो. सदर पाण्याचा उपयोग रब्बी व उन्हाळी हंगामामध्ये सिंचन व बिगर सिंचनासाठी केला जातो.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पूर्ण झालेल्या २४ ल.पा. प्रकल्पांमध्ये पावसाळा कालवधित पूर्ण क्षमतेने पाणी साठा केला जातो. सदर २४ ल.पा. प्रकल्पांवर कालव्याद्वारे सुमारे ९०० हेक्टर सिंचन क्षेत्र ओलिता खाली येत आहे. प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील नागरिकांना बिगर सिंचनासाठी पाणी पुरवठा केला जातो.

जून-२०२४ ते माहे सप्टेंबर-२०२४ अखेर पडलेले एकूण पर्जन्यनमान व निरिक्षण विहिरींची पाणी पातळी यांच्यानुसार संभाव्य पाणी टंचाई अहवाल तयार करण्यात येतो. सदर अहवालानुसार सिंधुदूर्ग जिल्ह्यातील मागील ५ वर्षांचे सरासरी पर्जन्यमान व निरीक्षण विहीरी यांच्या नोंदीची सप्टेंबर, २०२४ अखेरच्या नोंदीशी तुलना केली असता पर्जन्यमान व निरीक्षण विहिरी पाणी पातळीत वाढ दिसून येते व त्यानुसार माहे ऑक्टोबर, २०२४ ते जून, २०२५ पर्यंतच्या तीन टप्प्यातील संभाव्य टंचाईग्रस्त गावांची यादी निरंक आहे.

(३) सद्यस्थितीत पालघर जिल्ह्यात ३ गावे व २० वाडया यांना ११ खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे. उर्वरित जिल्ह्यांची पिण्याच्या पाण्याची निकड विचारात घेऊन टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यास मान्यता देण्याचे अधिकार संबंधित उपविभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यांना असून त्यासंबंधीच्या निवेदनांचा निपटारा उपविभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यांच्या पातळीवर करण्यात येतो.

(४) १) सद्यःस्थितीत कोकणात ४ मोठे, १० मध्यम आणि ३८ लघु प्रकल्प असे एकूण ५२ प्रकल्प बांधकामाधीन आहेत. त्यापैकी २२ प्रकल्पांचा पाणीसाठा पूर्णतः निर्माण करण्यात आला आहे. उर्वरित ३० प्रकल्पांपैकी काही प्रकल्पांना प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, नाबार्डच्या NIDA अंतर्गत कर्ज सहाय्य इ. विविध माध्यमातून तसेच शासन अंशदानातून राज्याच्या अर्थोपायाच्या स्थितीनुसार व मा. राज्यपाल महोदयांच्या निदेशातील निधी वाटपाच्या सूत्रानुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येवून प्रकल्प पूर्ण करण्यात येत आहे.

२) मागील दोन वर्षात सुमारे १३ सिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून नियोजनानुसार प्रकल्प पूर्ण करण्यात येत आहे.

३) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २ मोठे, ५ मध्यम आणि ८ लघु असे एकूण १५ प्रकल्प बांधकामाधीन आहेत. तिलारी, अरूणा व नरडवे या प्रकल्पांना प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमध्ये निधी प्राप्त होत आहेत. देवघर, नाधवडे, ओटाव, तळेरे या चार प्रकल्पांचा समावेश नाबार्डच्या NIDA अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उर्वरित प्रकल्पांना नियोजनानुसार शासन अंशदानातून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील यंत्रमाग उद्योगातील विविध मागण्या प्रलंबित असल्याबाबत

**(४२) ५८५३ (०५-०५-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमाग उद्योगातील वीज देयकातील थकबाकीवरील व्याज रद्द करणे ,मल्टीपल वीज कनेक्शन, साध्या यंत्रमागधारकांना ५ टक्के आणि शॉटलेस यंत्रमागाधारकांना २ टक्के व्याज अनुदान मिळणे, यंत्रमाग कामगार कल्याण मंडळ स्थापन करणे, सोलर प्रकल्प उभारणीतील अडचणी सोडविणे, निर्यात धोरणासाठी पायाभूत सुविधा, टेस्टिंग लॅब, औद्योगिक वसाहतीमध्ये आधुनिक अग्निशमन विरोधी यंत्रणा उभारणे इत्यादी विविध मागण्यांबाबत यंत्रमाग उद्योगातील विविध संघटनांनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनही त्यांच्या मागण्या अद्यापही कार्यवाहीविना प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंत्रमागण उद्योगातील अडचणी सोडविण्यासाठी तत्कालीन शासनाने एक समिती गठीत केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीने यंत्रमाग उद्योगातील अडचणी सोडविण्याच्या व यंत्रमाग संघटनांच्या मागण्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करुन अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अहवालातील शिफारशींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय सावकारे (१५-०५-२०२५) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील यंत्रमागधारकांच्या समस्यांचा अभ्यास करुन त्यावर उपायोजना सुचविण्यासाठी तत्कालीन मा. मंत्री (सार्वजनिक बांधकाम) (सा.उ.) यांचे अध्यक्षतेखाली, दिनांक १९ डिसेंबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक १५.०२.२०२४ रोजी त्यांचा अहवाल सादर केला असून सदर अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

यंत्रमाग उद्योगांना वीज बिलातील थकबाकीवरील व्याज रद्द करणे, मल्टीपल वीज कनेक्शन, अग्निशमन विरोधी यंत्रणा उभारणे यंत्रमाग कामगार कल्याण मंडळाची स्थापना, इत्यादी मागण्यांच्या अनुषंगाने संबंधीत उद्योग, उर्जा व कामगार विभाग तसेच नगर विकास विभाग यांना उचित कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर येथील वंदे मातरम् सभागृह बंद असल्याबाबत

**(४३) ५८६२ (०५-०५-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथे किलेअर्क येथे ३४ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले वंदे मातरम् सभागृह गेल्या वर्षभरापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सभागृहाचे ४५ लाखांचे वीज बिल थकीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सभागृह खासगीकरणातून चालविण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१७-०६-२०२५) :** (१) खरे नाही.

माहे डिसेंबर २०२४ व माहे जानेवारी २०२५ मध्ये विविध कार्यक्रमांसाठी आयोजकांना सभागृह भाडेतत्वावर देण्यात आलेले होते.

(२) अंशत: खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये उभारण्यात आलेल्या वंदे मातरम् सभागृहाचे माहे जानेवारी-२०२५ पर्यंतच्या विद्युत देयकाची रक्कम रुपये ४८,४४,८६०/- थकीत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडे भाडे पोटी प्रलंबित रु.१९,५०,००० इतकी रक्कम मिळणेबाबत शासनस्तरावरुन दिनांक २७.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच एकुण थकीत देयकापैकी उर्वरित देयकाच्या अदायगीसाठी रु.२५.८६ लक्ष इतकी रकम सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये पुनर्वितरण/पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सदर रक्कम शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी महावितरणाकडे दिनांक १६.०४.२०२५ रोजी जमा केलेली आहे.

(३), (४) व (५) सभागृह खाजगीकरणातून चालविण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केलेला नाही. तथापि, वंदेमातरम सभागृहाचे बाह्यस्थ संस्थेमार्फत संचालन / देखभाल व व्यवस्थापन करण्याच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबवून संस्थेची निवड करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## कोल्हापूर चित्रनगरी येथील विविध विकास कामाकरिता निधी मिळणेबाबत

**(४४) ५९६० (२७-०४-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर चित्रनगरी येथील विविध विकास कामाकरिता रु.७१ कोटी निधी मिळणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर अद्याप काहीच कार्यवाही करण्यात आलेली नसून विविध विकास कामांना शासन निधी उपलब्ध करून देणार आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०४-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे. अशा स्वरुपाचे दिनांक २४ जानेवारी, २०२५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) कोल्हापूर चित्रनगरी येथे रुपये ६४.०० कोटी इतक्या रकमेची कामे यापूर्वीच प्रगतीपथावर आहेत. तसेच, शासनाने कोल्हापूर चित्रनगरीमधील विविध विकास कामांसाठी रुपये ४५.५६ कोटी इतका निधी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात वितरित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्यातील होमगार्डना वर्षभर नोकरी व शासनाच्या अन्य सुविधा मिळण्याबाबत

**(४५) ६१२१ (२६-०४-२०२५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील होमगार्डना केवळ ८० दिवसाचेच काम दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, होमगार्डच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीने त्यांना ८० दिवसांऐवजी संपूर्ण ३६५ दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(३) असल्यास, होमगार्डसाठी शासनाच्या इतर प्रचलित सुविधा व कल्याणकारी योजना लागू करण्यात येणार आहेत काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) होमगार्ड ही पुर्णत: ऐच्छीक स्वरुपाची एक मानसेवी संघटना आहे. होमगार्ड संघटनेतील स्वयंसेवक हे स्वत:ची नोकरी, व्यवसाय सांभाळून देशसेवा करण्यासाठी संघटनेत नोंदणी करुन त्यांच्या मानसेवी सेवेचे अमुल्य योगदान देत असतात. पोलीस दलाला अंतर्गत सुरक्षा राखणे कामी सहाय्यकारी दल म्हणून काम करणे हे होमगार्ड संघटनेचे प्रमुख कर्तव्य आहे.

पोलीस दलाच्या मागणीप्रमाणे होमगार्ड स्वयंसेवक पोलीस दलास उपलब्ध करुन देण्यात येतात. होमगार्डना ३६५ दिवस काम देण्याच्या मागणीच्या अनुषंगाने, होमगार्डसना वर्षातून कमीत कमी १८० दिवस कर्तव्य देण्यासंदर्भात नियोजन करण्यात येत असून, शासनाच्या विविध विभागांना व संस्थांना होमगार्डस उपलब्ध करुन देण्याबाबत महासमादेशक कार्यालयामार्फत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच विविध विभागांच्या मागणीनुसार व होमगार्ड उपलब्धतेनुसार होमगार्ड सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सद्यस्थितीत मागणीनुसार होमगार्डसना सरासरी १२० ते १४० दिवस कर्तव्य उपलब्ध होत असून, होमगार्डसना जास्तीत जास्त कर्तव्य उपलब्ध होण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहेत.
(३) होमगार्ड ही मानसेवी संघटना असल्याने शासकीय कर्मचारी यांना अनुज्ञेय असलेल्या सुविधा व योजना होमगार्ड स्वयंसेवकांना लागू करणे शासन नियमानुसार शक्य नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नविन सहकारी साखर कारखान्यांसाठी बँक खाते उघडण्यास बंदी असतांना खाजगी साखर कारखाने स्थापन करण्यास कुठलेही निर्बंध नसल्याबाबत

**(४६) ६३११ (२९-०४-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नविन सहकारी साखर कारखान्यासाठी बँक खाते उघडण्यास बंदी असून खाजगी साखर कारखाना स्थापन करण्यासाठी कुठलेही निर्बध नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००२ पासून आजतागायत किती खाजगी साखर कारखाने स्थापन करण्यात आले आहे,

(३) असल्यास, खाजगी कंपनीमार्फत सहकारी साखर कारखाने खरेदी करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

**श्री. बाबासाहेब पाटील (१८-०६-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासनाने जा.क्र. समाका-१००२/११२५४/प्र.क्र.२५८/१३-स. दि.२३/०१/२००३ अन्वये राज्यात यापुढे नवीन सहकारी साखर कारखान्यांना बँकेत खाते उघडण्यास व नोंदणीस परवानगी देण्यात येऊ नये असा निर्णय झालेला आहे.

शुगर केन कंट्रोल ऑर्डर १९६६ मधील तरतूदी प्रमाणे खाजगी साखर कारखाने स्थापन केले जातात, त्यामुळे खाजगी साखर कारखाना स्थापन करण्यासाठी कुठलेही निर्बंध नाही यात कोणतेही तथ्य नाही.

(२) सन २००२ पासून आजतागायत १०१ खाजगी साखर कारखाने सुरु झालेले आहेत.

(३) १. अवसायनातील काही सहकारी साखर कारखाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व इतर वित्तिय संस्थांमार्फत थकीत कर्जाच्या वसूलीपोटी सरफेसी कायद्यांतर्गत जप्त करुन विक्री/भाड्याने देण्यात येतात. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या बँका कारखान्यांना तारणी कर्ज देत असल्याने सदर वित्तिय संस्थांकडील कर्जाच्या परतफेडीस प्राधान्य दिले जाते.

२. सहकारी साखर कारखाने सरफेसी कायद्यांतर्गत विक्री भाड्याने देण्याची कार्यवाही वित्तिय संस्थांच्या स्तरावरुन होत असून सदर कार्यवाही शासन मान्यतेने अथवा साखर आयुक्तालयाच्या स्तरावरुन केली जात नाही. सदर कार्यवाहीबाबत वित्तिय संस्थांकडून साखर आयुक्तालयास अवगत केले जात नाही. त्यामुळे या कार्यालयाचे खाजगी कंपनी मार्फत सहकारी साखर कारखाने खरेदीबाबत कार्यवाही करण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड (जि.पुणे) तालुक्यात येथे कैरा जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ गुजरात यांनी अमूल डेअरी आईस्क्रीम प्लॅाटची केलेली स्थापना

**(४७) ६३२२ (२६-०४-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यात (जि.पुणे) येथे कैरा जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ गुजरात यांनी अमूल डेअरी आईस्क्रीम प्लॅाटची स्थापना केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्लॅाटची स्थापना झाल्यामुळे स्थानिक पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ, कात्रज डेअरी आणि विभागातील इतर खाजगी दूध उत्पादक यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अमुल डेअरी आईस्क्रीम प्लॅाटला /स्थापनेला परवानगी देण्यामागची कारणे काय आहेत तसेच उक्त संघामध्ये पुणे जिल्हयातील स्थानिक दूध उत्पादक आणि राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना सदस्यत्व /शेअर देण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, दूग्ध उत्पादक कंपन्याकडून स्थानिक दूध उत्पादकांवर होणारे अन्याय दूर करण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१८-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४), (५) व (६) उदारीकरण व जागतिकीकरणासारख्या खुल्या आर्थिक धोरणामुळे देशाच्या कोणत्याही भागात व्यवसाय करता येतो. दुग्धव्यवसाय क्षेत्राच्या बाबतीत सहकार आयुक्त तथा निबंधक यांचे दिनांक १.१.२०१६ रोजीच्या आदेशान्वये परराज्यातील दूध संघांना महाराष्ट्र राज्यामध्ये दुग्धव्यवसाय करण्यासाठी काही अटी व शर्ती विहीत करून परवानगी देण्यात आलेली आहे. सदर निर्णयामुळे राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध खरेदीसाठीच्या स्पर्धात्मक वातावरणामुळे दुधाला किफायतशीर भाव मिळून त्यांचा आर्थिक फायदाच होणार आहे.

---

**राज्यातील महाराष्ट्र मार्ग परिवहन महामंडळाने कर्नाटक राज्यमार्ग परिवहन सेवा पॅटर्न राबविण्याबाबत**

**(४८) ६५१३ (२६-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाराष्ट्र मार्ग परिवहन महामंडळाने एस.टी.बस सेवा अधिक सुधारण्यासंदर्भात, कर्नाटक राज्यमार्ग परिवहन सेवा पॅटर्न राबविण्याबाबत शासनाकडून विचार करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी कर्नाटक, आंध्र प्रदेश व गुजरात राज्याचे अनेक दौरे केले असल्याचे दिनांक ८ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील एस.टी.बस सेवा सुधारुन परिवहन सेवेमध्ये सुसुत्रता आणून प्रवाश्यांना चांगल्या सुविधा प्राप्त करुन देण्याच्यादृष्टीने कर्नाटक वा गुजरात राज्याच्या धर्तीवर एस.टी. बससेवा सुधारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०२-०७-२०२५) :** (१), (२), (३) व (४) रा. प. महामंडळातील अधिका-यांनी कर्नाटक व गुजरात येथील राज्य परिवहन महामंडळास भेट दिली आहे.

KSRTC प्रमाणे MSRTC मध्ये पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- व्होल्वो प्रमाणे प्रतिष्ठित सेवांची branding करून प्रमुख मार्गांवर सदर सेवा देता येतील.
- विविध मार्गांवरील फेऱ्यांचे सुसूत्रीकरण करणे.
- प्रतिष्ठित सेवा व रातराणी सेवामध्ये चालक तथा वाहक यांचेकडून चालक व वाहक या दोन्ही पदांची कामगिरी करून घेण्याबाबतची पडताळणी करणे.
- वाहतूक व्यवस्थेत महितीतंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे.

गुजरात राज्य मार्ग परिवहन महामंडळाप्रमाणे MSRTC मध्ये पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

- Integrated Traffic Management System चा वापर करणे.
- पर्यटन व धार्मिक टूर्स पॅकेज चालविणे.
- सार्वजनिक-खाजगी सहभागांतर्गत (PPP) बसस्थानक / आगार इ. विकसित करण्याबाबत तज्ञांचे पटल (panel) तयार करून जागा विकसीत करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

---

## शिवाजीनगर (जि.पुणे) शहरातील जिल्हा सत्र न्यायालयातील आवारात सुरक्षाविषयक उपाययोजना केली नसल्याबाबत

**(४९) ६५७६ (२६-०४-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर (जि.पुणे) शहरातील जिल्हा सत्र न्यायालयात फौजदारी तसेच दिवाणी दाव्यांचे कामकाज चालत असून, येथील जर्मन बेकरी समोरील पोलीस स्टेशन समोर तसेच जंगली महाराज रस्त्यावरील बॉम्बस्फोट या घटनांमुळे पुणे दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असताना शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालय सारख्या अतिमहत्वाच्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही उपाययोजना केली नसून शिवाजीनगर न्यायालयाच्या आवारात नुकतेच एका तरुणाने देखील आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन न्यायालयाच्या सुरक्षिततेच्या उपाययोजनेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहे.?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक ०८-०२-२०२५ रोजी एका इसमाने पत्नीची ओढणी घेवून शिवाजीनगर (जि.पुणे) शहरातील जिल्हा सत्र न्यायालयाच्या आवारातील चिंचेच्या झाडावर चढून ओढणीचे सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. सदर प्रकरणी शिवाजी नगर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे स्टेशन डायरी नं.०३/२०२५, अकस्मात मृत्यु रजिस्टर क्र.०८/२०२५, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १९४ प्रमाणे दिनांक ०८-०२-२०२५ रोजी नोंद घेण्यात आलेली असून सदर घटनेबाबतचा पुढील तपास सुरु आहे.

न्यायालय सुरक्षिततेच्या अनुषंगाने खालील सुरक्षाविषयक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

- जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर पुणे सुरक्षेसाठी स्वतंत्र शाखा कार्यरत असून सदर ठिकाणी कोर्ट व परिसराच्या सुरक्षेकरीता एकुण २०७ पोलीस अधिकारी / अंमलदार बंदोबस्त पुरविण्यात येत आहे.
- दररोज जिल्हा न्यायालयाचे आवारात बॉम्ब शोध व नाशक (बी.डी.डी.एस. पथक) पुणे शहर यांचेकडून घातपात विरोधी तपासणी करण्यात येते.
- तसेच न्यायालय प्रशासनाकडून एकुण २४६ आणि पोलीस प्रशासनाकडून ०३ असे एकुण २४९ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे जिल्हा न्यायायाच्या आवारात बसविण्यात आलेले आहेत.

न्यायालय सुरक्षेच्या अनुषंगाने वेळोवेळी सुरक्षा ऑडीट करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसेस उभ्या करण्याकरीता एस.टी. महामंडळाची विनावापरातील जागा भाडेतत्वावर मिळण्याबाबत

**(५०) ६६६९ (२६-०४-२०२५). श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसेस उभ्या करण्याकरीता एस.टी. महामंडळाची विनावापरातील जागा भाडेतत्वावर मिळण्यासाठी महानगरपालिकेकडून सन २०१२ पासून सन २०२२ पर्यंत महापौर, आयुक्त, तसेच परिवहन व्यवस्थापक, यांनी वेळोवेळी नकाशासह आवश्यक जागेचा प्रस्ताव सादर करूनही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने अद्याप कोणतेही कार्यवाही केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून दिनांक २० मार्च, २०१७ रोजी या प्रस्तावास अंशत: मान्यता देऊनही अद्यापपर्यंत विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, प्रवासी सेवेच्या व्यापक हितासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या या प्रस्तावित जागा महानगरपालिकेस भाडेतत्वावर देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०३-०७-२०२५) :** (१), (२), (३) व (४) प्रस्तावास अंशत: मान्यता देण्यात आली असून, वसई-विरार महानगरपालिकेकडुन मौजे विरार (पुष्पानगर) बसस्थानकाच्या रा.प. मालकीच्या जागेतुन सन-२०१७ पासुन ६५१ चौ. कि.मी जागेचा वापर सुरू आहे. तसेच नालासोपारा येथील बसस्थानाकच्या जागेलगत असणाऱ्या जागेतुन परिवहन सेवा सुरू आहे. नवघर (वसई) व नालासोपारा बसस्थानकाची जागा वसई-विरार महानगरपालिकेला परिवहन सेवेला देणे शक्य नाही असे कळविण्यात आले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.